**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग मुंबई**

९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस,
(सीएसएमटी) समोर, मुंबई -४०० ००१

दूरध्वनी :- २२०३४२३३ Email ID :-do-mshrc@mah.gov.in

जा.क्र.एमएसएचआरसी/सेवाकंत्राटी करार/६/२०२६ / १२४७ दिनांक २२जून, २०२६

22 JUN 2026

जाहिरात

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई या कार्यालयातील कक्ष अधिका-यांचे एक पद राज्य शासकीय सेवानिवृत्त अधिका-यांमधून सेवा करार (कंत्राटी) पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक सीबीई १५२५/ प्र.क्र.३७ / आस्थामं (का.१३), दिनांक १० जून,२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणा-या राज्य शासकीय सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांकडून सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी पदाच्या समकक्ष सेवानिवृत्त अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदांचे नाव | वेतनश्रेणी | एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | कक्ष अधिकारी | S-15 ( 41800 - 132300) | १ |

उमेदवारांनी आपले अर्ज सचिव, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,मुंबई, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१ यांच्याकडे टपालाव्दारे किंवा वर नमूद ई-मेलवर सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दिनांक २५ जून,२०२६ ते दिनांक ९ जुलै,२०२६ या कार्यालयीन दहा दिवसाच्या कालावधीत शासकीय सुट्टीचे दिवस सोडून सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.००वाजेपर्यंत अर्ज सादर करावे.

| | | |
|---|---|---|
| १. | वेतनमान | वेतनश्रेणीप्रमाणे व शासन निर्णयाप्रमाणे |
| २. | वय वर्षे ६५ पर्यंत | १.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीबीई १५२५/ प्र.क्र.३७ / आस्थामं (का.१३), दिनांक १० जून,२०२५ नूसार |

सेवानिवृत्त अधिकारी आणि कर्मचा-यांनी अर्जासोबत स्वत:चा अलिकडचा पासपोर्ट साईज फोटो,अर्हता,प्रमाणपत्रांच्या प्रती तसेच राज्य शासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या PPO ची छायांकित प्रत, शैक्षणिक अर्हता,विशेष अर्हता व ३ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य यांच्या प्रमाणित प्रती अर्जासोबत जोडाव्यात , त्याचप्रमाणे संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक Whatsapp ,ईमेल आयडी नमूद करण्यात यावा. अर्जासोबत स्वत:चा पत्ता लिहलेला व पुरेसा पोस्टेज स्टँम्प असलेला रिकामा लिफाफा जोडावा. कक्ष अधिकारी यांना सेवा विषयक बाबी, बिंदूनामावली,आकृतीबंध,सेवाप्रवेश,मराठी/इंग्रजी टंकलेखन येत असल्यास प्राधान्य

१. उमेदवार राज्य शासनाच्या सेवेतून गट ब (राजपत्रित) संवर्गातील पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

२. समकक्ष पदाच्या वेतनश्रेणीस अनुज्ञेय वेतनाच्या मर्यादेत वेतन अनुज्ञेय राहील व सेवांचा राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिन्याची नोटीस आगाऊ आयोगास द्यावी लागेल अन्यथा एका महिन्याचे वेतन आयोगात भरावे लागेल.

३. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी हे मुंबई अथवा ठाणे,कल्याण, पालघर जिल्हयातील व नवीमुंबई या लगतच्या शहरात राहणारा असावा.

४. आयोगातील नियुक्त समितीमार्फत सेवानिवृत्त अधिका-यांची मुलाखत घेऊन पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.

५. महाराष्ट्र नागरी सेवाविषयक कामाचा अनुभव तसेच मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य राहील.

६. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या निवडीबाबत संपूर्ण अधिकार महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा राहील. तसेच विशेष परिस्थितीत कोणत्याही कारणा व्यक्तिरिक्त सेवानिवृत्त अधिकारी यांच्या करारपध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार ही आयोगास राहतील.

७. विशेष अर्हता व कामाचा अनुभव, मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान नसलेल्या अर्जावर विचार केला जाणार नाही आणि अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही. अधिक माहितीकरिता आयोगाची वेबसाईट www.mshrc.gov.in येथे भेट द्यावी.

८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती,सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

९. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील व त्यांच्या कामाचे मूल्यमापन वेळोवेळी करण्यात येईल.

१०. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार /हक्क नसेल.

मा.अध्यक्षांच्या मान्यतेने

(वि. प्र.केदार)
प्रबंधक तथा सचिव (अति.कार्यभार)
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई.

सोबत अर्जाचा नमूना जोडला आहे.

## अर्जाचा नमूना

### कक्ष अधिकारी (गट-ब/ राजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी करार पध्दतीने नियुक्तीसाठी करावयाचा अर्ज.

पासपोर्ट फोटो

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे संपूर्ण नाव | |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता व ई-मेल | |
| ३ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | जन्मदिनांक | |
| ५ | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ६ | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | |
| ७ | सेवानिवृत्ती वेतन घेत असलेल्या बँकेचे नाव व खाते क्रमांक | |
| ८ | शैक्षणिक अर्हता : बोर्ड / विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण वर्ष टक्केवारी/श्रेणी याबाबतचा तपशील | |
| ९ | संगणक व इतर अर्हता | |
| १० | शासकीय कामकाजाच्या अनुभवाचा तपशील | |
| ११ | प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहितीपैकी कोणतीही माहिती असत्य / चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कारवाई होऊ शकते, याची मला पूर्ण जाणीव आहे. | |
| १२ | कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरुपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणाधिकार हक्क निर्माण होत नाही. मी नमूद केलेल्या तपशीलाच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास मी सादर करण्याची हमी देत आहे. | |

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

दिनांक :

स्थळ :

** वरीलप्रमाणे नमूद सर्व कागदपत्रांच्या छायांकित स्वसाक्षांकित प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.